**इंडिया फाउंडेशन फॉर द आर्टच्या अनुदान कार्यक्रमांसंदर्भात मार्गदर्शक तत्वे**

आयएफएचे, भूतकाळातील आणि सद्य असे देणगीदार, विश्वस्त आणि कर्मचारी हे त्यांच्या त्यांच्या कलाप्रांतातील प्रख्यात लोकं असल्याकारणाने, आयएफएच्या अनुदान / शिष्यवृत्ती कार्यक्रमात, कोणत्याही प्रकारे हितसंबंध आड येऊ नयेत यासाठी ही मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ही मार्गदर्शक तत्वे पुढे दिलेल्या लोकांना लागू आहेत.:

**1. कर्मचारी**

1.1. आयएफएच्या नोकरीतील कार्यकाळात

a. आयएफएचे कर्मचारी, त्यांच्या आयएफएच्या नोकरीच्या कार्यकाळात, कोणत्याही अनुदान / शिष्यवृत्तीसाठी अर्ज करायला पात्र असणार नाहीत.
b. अशा कर्मचाऱ्यांचे जवळचे कुटुंबीय म्हणजे पालक, भावंडे, पती किंवा पत्नी आणि अपत्ये (एकत्रितपणे "**जवळचे कुटुंबीय**"), अशा कर्मचाऱ्यांच्या आयएफएच्या नोकरीच्या कार्यकाळात, कोणत्याही अनुदान / शिष्यवृत्तीसाठी अर्ज करायला पात्र असणार नाहीत.
c. कोणतीही संस्था किंवा अशा संस्था जिथे आयएफएचा कर्मचारी संचालक मंडळात आहे किंवा कोणत्याही निर्णय घेण्याच्या पदावर आहे, अशा संस्था, अशा कर्मचाऱ्यांच्या आयएफएच्या नोकरीच्या कार्यकाळात, कोणत्याही अनुदान / शिष्यवृत्तीसाठी अर्ज करायला पात्र असणार नाहीत.

1.2. आयएफएच्या नोकरी संपल्यावर / निवृत्त झाल्यावर

a. असे कर्मचारी, आयएफएच्या नोकरीतून निवृत्त झाल्यानंतर दोन (२) वर्षे पूर्ण होईपर्यंत कोणत्याही अनुदान / शिष्यवृत्तीसाठी अर्ज करायला पात्र असणार नाहीत.
b. अशा कर्मचाऱ्यांचे जवळचे कुटुंबीयसुद्धा, अशा कर्मचाऱ्यांच्या आयएफएच्या नोकरीतून निवृत्त झाल्यानंतर दोन (२) वर्षे पूर्ण होईपर्यंत कोणत्याही अनुदान / शिष्यवृत्तीसाठी अर्ज करायला पात्र असणार नाहीत.
c. कोणतीही संस्था किंवा अशा संस्था जिथे आयएफएचा कर्मचारी संचालक मंडळात आहे किंवा कोणत्याही निर्णय घेण्याच्या पदावर आहे, अशा संस्था, अशा कर्मचाऱ्यांच्या आयएफएच्या नोकरीतून निवृत्त झाल्यानंतर एक (१) वर्षं पूर्ण होईपर्यंत कोणत्याही अनुदान / शिष्यवृत्तीसाठी अर्ज करायला पात्र असणार नाहीत.

**2. विश्वस्त**

2.1. त्यांच्या विश्वस्त असण्याच्या कार्यकाळात

a. आयएफएचे विश्वस्त, त्यांच्या आयएफएच्या संचालक मंडळावरील विश्वस्त कालावधीत, कोणत्याही अनुदान / शिष्यवृत्तीसाठी अर्ज करायला पात्र असणार नाहीत.
b. अशा आयएफएच्या विश्वस्तांचे जवळचे कुटुंबिय, त्यांच्या आयएफएच्या संचालक मंडळावरील विश्वस्त कालावधीत, कोणत्याही अनुदान / शिष्यवृत्तीसाठी अर्ज करायला पात्र असणार नाहीत.
c. कोणतीही संस्था किंवा अशा संस्था जिथे आयएफएचे विश्वस्त संचालक मंडळात आहेत किंवा कोणत्याही निर्णय घेण्याच्या पदावर आहेत, अशा संस्था, अशा विश्वस्तांच्या, आयएफएच्या संचालक मंडळावरील विश्वस्त कालावधीत, कोणत्याही अनुदान / शिष्यवृत्तीसाठी अर्ज करायला पात्र असणार नाहीत.

2.2. विश्वस्त कालावधी संपल्यानंतर

a. आयएफएचे विश्वस्त, आयएफएबरोबरचा विश्वस्त म्हणून कालावधी संपल्यानंतर, तीन (३) वर्षे पूर्ण होईपर्यंत, कोणत्याही अनुदान / शिष्यवृत्तीसाठी अर्ज करायला पात्र असणार नाहीत.
b. अशा विश्वस्तांचे जवळचे कुटुंबियसुद्धा, अशा विश्वस्तांचा आयएफएबरोबरचा विश्वस्त म्हणून कालावधी संपल्यानंतर, तीन (३) वर्षे पूर्ण होईपर्यंत, कोणत्याही अनुदान / शिष्यवृत्तीसाठी अर्ज करायला पात्र असणार नाहीत.
c. कोणतीही संस्था किंवा अशा संस्था जिथे आयएफएचे विश्वस्त, संचालक मंडळात आहेत किंवा कोणत्याही निर्णय घेण्याच्या पदावर आहेत, अशा संस्था, अशा विश्वस्तांचा, आयएफएबरोबरचा विश्वस्त म्हणून कालावधी संपल्यानंतर एक (१) वर्ष पूर्ण होईपर्यंत किंवा त्यांचा अशा दुसऱ्या संस्थेबरोबर विश्वस्त म्हणून कालावधी संपल्यानंतर, यांपैकी जे काही नंतर घडेल ते घडल्याशिवाय, कोणत्याही अनुदान / शिष्यवृत्तीसाठी अर्ज करायला पात्र असणार नाहीत.

**3. देणगीदार**

"**आयएफएचे मित्र**", म्हणजे असे देणगीदार, ज्यांनी आयएफएला, साधारण देणगी म्हणून किंवा एखाद्या विशिष्ट कार्यक्रमासाठी किंवा आयएफएच्या कॉर्पस रक्कमेसाठी, पन्नास हजारापेक्षा (भारतीय रुपये ५०,०००,/-) कमी रक्कम दिली आहे.

"**आयुष्यभराचे मित्र**", म्हणजे असे देणगीदार, ज्यांनी आयएफएला, साधारण देणगी म्हणून किंवा एखाद्या विशिष्ट कार्यक्रमासाठी किंवा आयएफएच्या कॉर्पस रक्कमेसाठी, पन्नास हजारापेक्षा (भारतीय रुपये ५०,०००,/-) जास्त पण एक लाखापेक्षा (भारतीय रुपये १,००,०००/-) कमी रक्कम दिली आहे.

“**देणगी आश्रयदाते**”, म्हणजे असे देणगीदार, ज्यांनी आयएफएला, साधारण देणगी म्हणून किंवा एखाद्या विशिष्ट कार्यक्रमासाठी किंवा आयएफएच्या कॉर्पस रक्कमेसाठी, एक लाखापेक्षा (भारतीय रुपये १,००,०००/-) जास्त रक्कम दिली आहे.

“**देणगीदार संस्था**” म्हणजे असे देणगीदार जे व्यावसायिक संस्था, ट्रस्ट, सोसायटी, भागीदारी संस्था वगैरे आहेत ज्यांनी आयएफएला, साधारण देणगी म्हणून किंवा एखाद्या विशिष्ट कार्यक्रमासाठी किंवा आयएफएच्या कॉर्पस रक्कमेसाठी, देणगी दिली आहे.

a. “**आयएफएचे मित्र**”, त्यांच्या देणगीचा कालावधी संपल्यानंतर एक (१) वर्षाने, कोणत्याही अनुदान / शिष्यवृत्तीसाठी अर्ज करायला पात्र असतील.
b. “**आयुष्यभराचे मित्र**”, त्यांच्या देणगीच्या तारखेपासून तीन (३) वर्षांनंतर, कोणत्याही अनुदान / शिष्यवृत्तीसाठी अर्ज करायला पात्र असतील.
c. “**देणगी आश्रयदाते**”, त्यांच्या देणगीच्या तारखेपासून पाच (५) वर्षांनंतर, कोणत्याही अनुदान / शिष्यवृत्तीसाठी अर्ज करायला पात्र असतील.
d. “**देणगीदार संस्था**”, त्यांचे आयएफएला दिले जाणारे आर्थिक सहाय्य प्रलंबित असताना कोणत्याही अनुदानासाठी अर्ज करायला पात्र असणार नाहीत. “**देणगीदार संस्था**”, त्यांनी आयएफएला दिलेले आर्थिक सहाय्य कशाप्रकारे वापरले गेले आहे याचा हिशोब आयएफएने त्यांना सादर केल्याच्या तारखेपासून, एक (१) वर्षानंतर अनुदानासाठी अर्ज करण्यास पात्र ठरतील. हे स्पष्ट केले जात आहे की असा आर्थिक अहवाल पूर्ण करून, देणगीदार संस्थेला, तेव्हांच सादर करण्यात येईल जेंव्हा त्या देणगीतून चालवला जाणारा प्रकल्प / त्यातून ठरवलेला खर्च पूर्ण होईल.
e. देणगीदार संस्थेचे कर्मचारी किंवा तिथे निर्णय घेण्याच्या पदावर काम करणाऱ्या व्यक्ती, त्या संस्थेने आयएफएला दिलेले आर्थिक सहाय्य कशाप्रकारे वापरले गेले आहे याचा हिशोब आयएफएने त्यांच्या संस्थेला सादर केल्याच्या तारखेपासून, एक (१) वर्षानंतर किंवा त्यांची त्या संस्थेबरोबरची नोकरी संपल्यानंतर एक (१) वर्षाने, अनुदानासाठी अर्ज करण्यास पात्र ठरतील.